# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:04.12.2025** **वार:गुरुवार**

1. राष्ट्रपतींच्या हस्ते राष्ट्रीय दिव्यांगजन सशक्तिकरण पुरस्कारांचं वितरण
2. राज्य विधीमंडळाचं हिवाळी अधिवेशन येत्या 8 ते 14 डिसेंबर दरम्यान
3. केंद्रीय उत्पादन शुल्क सुधारणा विधेयक लोकसभेत आवाजी मतदानानं मंजूर
4. संचार साथी ॲपमुळे फसवणूक रोखण्यात बरंच यश आल्याचं केंद्रिय मंत्री ज्योतिरादित्य शिंदे यांचं मत आणि
5. भारत-दक्षिण अफ्रिकेदरम्यानच्या एकदिवसीय सामन्यांच्या मालिकेतल्या दुसऱ्या सामन्यात दक्षिण अफ्रिका विजयी.

**जागतिक दिव्यांग दिन**

दिव्यांग व्यक्तींनाही समानतेचा अधिकार मिळाला पाहिजे. दिव्यांगजनांच्या समान सहभागानंच कोणताही समाज खऱ्या अर्थाने विकसित समाज म्हणून ओळखला जातो असं प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केलं. जागतिक दिव्यांग दिनानिमित्त काल राष्ट्रपतींच्या हस्ते राष्ट्रीय दिव्यांगजन सशक्तिकरण पुरस्कार प्रदान करण्यात आले, त्यावेळी त्या बोलत होत्या. दिव्यांगांच्या कल्याणासाठी कार्यरत संस्था आणि उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या दिव्यांग व्यक्तींना दरवर्षी हे पुरस्कार दिले जातात. पुण्यातील व्यावसायिक कौशल्य शिक्षिका भाग्यश्री मनोहर नादी मित्तला कन्ना आणि 'टिकलर आर्ट'ची संस्थापक धृती रांका यांचा पुरस्कार विजेत्यांमध्ये समावेश आहे.

राज्यातही दिव्यांगांच्या शासनमान्य शाळा आणि कार्यशाळांमध्ये काल विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. विद्यार्थ्यांचे सांस्कृतिक, विविध गुणदर्शन कार्यक्रम, जन जागृतीपर पथनाट्य इत्यादींचा यामध्ये समावेश होता. पुण्यात जिल्हा परिषदेनं दिव्यांगांसाठी तयार केलेल्या 'स्पंदन' या ऑनलाईन नोंदणी पोर्टलचं काल लोकार्पण करण्यात आलं. पुणे जिल्ह्यातील दिव्यांग व्यक्तींना विविध शासकीय योजना आणि सुविधांचा लाभ मिळवून देणं हा या पोर्टलचा मुख्य उद्देश आहे.

**दिव्यांग समिती**

दिव्यांग व्यक्तींना शासकीय, निमशासकीय सेवेत नियुक्ती आणि पदोन्नतीमध्ये चार टक्के आरक्षणाचा कायदेशीर हक्क प्रभावीपणे मिळावा, यासाठीच्या पदसुनिश्चिती प्रक्रियेसाठी राज्य शासनानं एकसमान कार्यपद्धती तयार केली आहे. पदसुनिश्चिती प्रक्रिया अधिक शास्त्रीय आणि पारदर्शक करण्याच्या हेतूनं तज्ज्ञ समितीची पुनर्रचनादेखील करण्यात आली आहे. प्रत्येक मंत्रालयीन विभागाच्या या समितीत अंध-अल्पदृष्टी, श्रवणदोष, अस्थिव्यंगता, स्वमग्नता, विशिष्ट शिक्षण अक्षमता आणि मानसिक आजार अशा विविध प्रवर्गातील किमान एका तज्ज्ञाचा समावेश असेल. या निर्णयामुळे राज्यातल्या लाखो दिव्यांग उमेदवारांसाठी रोजगार आणि सर्व स्तरांवर समान संधी उपलब्ध होण्यात मदत होणार असल्याचं दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव तुकाराम मुंढे यांनी सांगितलं.

**राज्य विधीमंडळ अधिवेशन**

राज्य विधीमंडळाचं हिवाळी अधिवेशन येत्या 8 ते 14 डिसेंबर दरम्यान नागपूरमध्ये होणार आहे. 13 आणि 14 डिसेंबर रोजी म्हणजेच शनिवारी आणि रविवारीही विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहाचं काम सुरू ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. काल मुंबईत विधीमंडळ कामकाज सल्लागार समितीची बैठक झाली. या बैठकीत हे निर्णय घेण्यात आले.

**मुख्यमंत्री**

अतिवृष्टी आणि पुरामुळे बाधित शेतकऱ्यांच्या मदतीसाठी केंद्र सरकारला प्रस्ताव पाठवल्यानंतरच केंद्राचं पथक नुकसानीच्या पाहणीसाठी राज्यात येऊन गेल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. राज्य सरकारनं असा प्रस्ताव पाठवला नसल्याचा

आरोप विरोधकांनी केला होता. त्याला मुख्यमंत्र्यांनी काल उत्तर दिलं. पायाभूत सोयीसुविधांच्या नुकसान भरपाईसाठी स्वतंत्र प्रस्ताव पाठवणार असल्याचंही फडणवीस यांनी सांगितलं.

**एक्साइज टॅक्स**

केंद्रिय उत्पादन शुल्क सुधारणा विधेयक काल लोकसभेत आवाजी मतदानानं मंजूर झालं. तंबाखूजन्य पदार्थांवरील उत्पादन शुल्क आणि उपकर वाढवण्यासाठीचा प्रस्ताव या विधेयकाद्वारे मांडण्यात आला आहे. हा कोणताही नवीन कायदा नाही अथवा अतिरिक्त कर नाही. वस्तू आणि सेवा कर लागू होण्याआधी अस्तित्वात असलेलं हे उत्पादन शुल्क आहे. जीएसटी लागू झाल्यानंतरही 2024 पर्यंत उपकरात वाढ करण्यात आली नव्हती असं केंद्रिय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी विधेयकावरील चर्चेदरम्यान सांगितलं. गेल्या काही वर्षांत आणि आत्ताही तंबाखूच्या शेतीमुळे होणाऱ्या नुकसानीबाबत शेतकऱ्यांमध्ये जनजागृती केली जात आहे. तंबाखूची शेती होत असलेल्या 1 लाख 12 हजार एकरपेक्षा जास्त क्षेत्रावर 2018 ते 2022 दरम्यान इतर पिकं घेतली जात आहेत अशी माहिती त्यांनी दिली.

**संचारसाथी ॲप**

संचार साथी ॲपचा जास्तीत जास्त नागरिक स्वीकार करत असल्याच्या पार्श्वभूमीवर हे ॲप उत्पादकांनी आधीपासूनच मोबाईलमध्ये इन्स्टॉल करणं ऐच्छिक करण्याचा निर्णय सरकारनं घेतला आहे. नागरिकांनाही हे ॲप त्यांना हवं तेव्हा मोबाईलमधून काढून टाकता येईल. तसंच या ॲपचा वापरकर्त्यांच्या सुरक्षेशिवाय इतर कोणताही उपयोग नाही असंही सरकारनं स्पष्ट केलं. या ॲपमुळे फसवणूक रोखण्यात यश आल्याचं संसदेत सांगताना केंद्रिय दूरसंवाद मंत्री ज्योतिरादित्य शिंदे म्हणाले.....

**इस ऐप और पोर्टल के आधार पर डेढ़ करोड़ मोबाइल कनेक्शन देश के अंदर डिस्कनेक्ट हुए हैं जो फ्रॉडुलेंट हैं। करीब छब्बीस लाख स्टोलन हैंडसेट हम लोगों ने ट्रेस किए और इकतालीस लाख मोबाइल कनेक्शन डिस्कनेक्ट हुए हैं। छह लाख फ्रॉड हम लोगों ने ब्लॉक किए हैं।**

**वैष्णव-एआय**

नागरिकांच्या वैयक्तिक माहितीच्या गोपनीयतेसाठी संसदेनं डिजिटल वैयक्तिक माहिती संरक्षण कायदा केल्याचं इलेक्ट्रॉनिक्स तसंच माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल सांगितलं. ते लोकसभेत प्रश्नोत्तराच्या तासात बोलत होते. कृत्रिम बुद्धीमत्ता ॲप आणि कृत्रिम बुद्धीमत्ता प्रारुपे यांनाही या कायद्याच्या कक्षेत आणलं असल्याचं सांगून वैष्णव म्हणाले.....

**हमें सोशल मीडिया पर फेक न्यूज पर एआई जनरेटेड डीप फेक पर स्ट्रिक्ट एक्शन लेने की जरूरत है। जिस तरह से सोशल मीडिया प्लेटफॉर्म्स का उपयोग करके एक तरीके से कई ऐसे इको सिस्टम बन गए हैं जो कि भारत के संविधान को फॉलो नहीं करना चाहते। बहुत तरह से इस पार्लियामेंट द्वारा बनाए हुए कानून को भी पालन नहीं करना चाहते। उसमें स्ट्रिक्ट एक्शन लेने की और कड़े नियम बनाने की सख्त जरूरत है।**

**मोहोळ राज्यसभा**

राष्ट्रीय सहकारी निर्यात लिमिटेड, राष्ट्रीय सहकारी सेंद्रिय लिमिटेड तसंच भारती बीज सुरक्षा आणि सेवा लिमिटेड या तीन महत्त्वाच्या राष्ट्रीय सहकारी संस्थांमध्ये महाराष्ट्राचा सहभाग वाढत आहे. याचा थेट लाभ राज्यातल्या शेतकरी आणि सहकारी संस्थांना होत असल्याची माहिती सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी दिली. ते काल राज्यसभेत एका प्रश्नाच्या उत्तरादाखल बोलत होते. देशातील आठ लाख सहकारी समित्यांपैकी सव्वा दोन लाख समित्या महाराष्ट्रात आहेत. देशाच्या सहकार क्षेत्रात महाराष्ट्र आघाडीवर आहे असं मोहोळ म्हणाले.

**पुणे पुस्तक महोत्सव**

वाचन संस्कृतीला चालना देण्याच्या उद्देशानं गेली दोन वर्ष राष्ट्रीय पुस्तक न्यासातर्फे पुणे पुस्तक महोत्सव आयोजित केला जात आहे. 13 ते 21 डिसेंबर या काळात फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मैदानावर हा महोत्सव होणार असून महोत्सवात विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. या कार्यक्रमांबाबत माहिती देऊन महोत्सवात उत्स्फूर्तपणे सहभागी होण्याचं आवाहन राष्ट्रीय पुस्तक न्यासाचे राजेश पांडे यांनी केलं.....

**यावर्षी पुढे पुस्तक महोत्सवामध्ये आठशे पेक्षा जास्त स्टॉल आहेत. देशातल्या सर्व भाषांमध्ये स्टॉल आहे आणि यावेळेस पुस्तक महोत्सव आहे, यावेळेस चिल्ड्रेन महोत्सव आहे, यावेळेस साहित्य महोत्सव आहे, यावेळेस सांस्कृतिक महोत्सव आहे, असे अनेक कार्यक्रम आहेत. सांस्कृतिक महोत्सवात सुद्धा आंतरराष्ट्रीय दर्जाचे कार्यक्रम या ठिकाणी होणार आहेत पुस्तकाच्या महाकुंभमध्ये सहभागी व्हा मोठ्या प्रमाणात पुस्तकं खरेदी करा आणि एकूणच डिजिटल ड्रग्समध्ये अडकत जाणाऱ्या पिढीला आपण बाहेर काढून वाचनाच्या संस्कृतीमध्ये जोडूया...**

### पन्नालाल सुराणा-निधन

राष्ट्र सेवा दलाचे माजी अध्यक्ष पन्नालाल सुराणा यांच्या इच्छेनुसार त्यांचं मरणोत्तर देहदान करण्यात आलं. मंगळवारी रात्री त्यांचं 92 व्या वर्षी हृदयविकाराच्या झटक्यानं त्यांचं निधन झालं दैनिक मराठवाडाचे संपादक, तसंच कुर्डूवाडीच्या ग्रामोदय समितीचे अध्यक्ष म्हणून काम केलं होतं. 93 साली झालेल्या विनाशकारी भूकंपानंतर सुराणा यांनी नळदुर्ग जवळ आपलं घर नावचा मोठा प्रकल्प उभारून भूकंपबाधित मुलांच्या पुनर्वसन आणि शिक्षणाची व्यवस्था केली होती. याच संस्थेत त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्याच्या निधनाविषयी शोक व्यक्त करताना, समाजकारण-राजकारणातील निस्पृहतेचा आदर्श काळाच्या पडद्याआड गेल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. तर भूमिहीन शेतकरी, मजूर, वंचितांच्या हक्कांसाठी लढणारं व्यक्तिमत्त्व काळाच्या पडद्याआड गेलं अशा शब्दांत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शोकभावना व्यक्त केल्या.

### क्रिकेट

भारत आणि दक्षिण अफ्रिकेदरम्यान काल रायपूर इथं झालेल्या 50 षटकांच्या क्रिकेट सामन्यात दक्षिण आफ्रिकेने भारताचा 4 गडी राखून पराभव केला. विजयासाठी 359 धावांचा पाठलाग करताना, दक्षिण आफ्रिकेने 4 चेंडू शिल्लक असताना 6 बाद 362 धावा केल्या. तीन सामन्यांच्या मालिकेत दोनही संघांची 1-1 अशी बरोबरी आहे. मालिकेतील अंतिम सामना येत्या शनिवारी विशाखापट्टणम इथं खेळला जाईल.

### हवामान

राज्यात आज सर्वत्र कोरडं हवामान असेल असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्राचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.

## नमस्कार.